आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
३१ मे २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचं अनुकरण करण्याची गरज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- अहिल्यादेवींच्या जयंतीनिमित्त राज्यात ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन, अहिल्यानगरात चौंडी इथं विविध विकासकामांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रारंभ

- मंगोलिया इथं आयोजित ‘उलान बातर २०२५ कुस्ती’ स्पर्धेत भारतीय कुस्तीवीरांची ४ सुवर्णपदकांची कमाई

**आणि**

- अरुणाचल प्रदेशात पूर्व कामेंग जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या भूस्खलनात सात जणांचा मृत्यू

**<><><><>**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे विचार प्रेरणादायी असून त्यांच्या विचारांचं अनुकरण करण्याची आज गरज आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज भोपाळ इथं आयोजित ‘देवी अहिल्यादेवी होळकर महिला सशक्तीकरण महासंमेलनात’ बोलत होते. अहिल्यादेवींचं नाव ऐकताच मनात श्रद्धाभाव निर्माण होतो आणि कोणत्याही कठीण परिस्थितीत राज्य, कसं पुढे न्यायचं हे त्यांच्याकडून शिकण्यासारखं आहे, असं ते यावेळी म्हणाले. अहिल्यादेवींनी एक उत्तम प्रशासक आणि लोकशाहीचं उत्तम प्रमाण सादर केलं. जलसंवर्धनाचं महत्व अधोरेखित करत त्यांनी अनेक धार्मिक स्थळांचा उद्धार केला आणि तीनशे वर्षांपूर्वीच्या गुलामगिरीच्या काळात सशक्त राज्य उभारत स्त्री शक्तीचा आदर्श समाजासमोर ठेवला, असं प्रधानमंत्री म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त मध्य प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. अहिल्याबाईंच्या स्मरणार्थ आज एका टपाल तिकिटाचं आणि विशेष नाण्याचंही मोदी यांच्या हस्ते प्रकाशन झालं. तसंच अनेक प्रकल्पांचं आणि योजनांचं

लोकार्पण यावेळी करण्यात आलं. तर इंदूरच्या मेट्रो स्थानकाचं त्यांनी यावेळी दूरस्थ प्रणालीद्वारे उद्घाटन केलं. या कार्यक्रमाला मध्यप्रदेशचे राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

<><><><>

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज राजभवन इथं अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रामगिरी इथं अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

अहिल्यादेवी यांच्या जयंतीनिमित्त आज राज्यभरात विविध कार्यक्रम होत आहेत. गोंदिया जिल्ह्यातल्या आमगाव देवरी विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय पुराण यांच्या पुढाकारानं आयोजित एका कार्यक्रमात 10वी आणि 12 वी मध्ये अव्वल क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा आज सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे सामाजिक कार्यात महत्वाचं काम केलेल्या महिलांचे देखील यावेळी शाल आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आले. अहिल्याबाई होळकर यांच्या बद्दल विद्यार्थ्यांना माहिती मिळावी, यासाठी व्याख्यान सुद्धा आयोजित करण्यात आलं होतं, अशी माहिती आकाशवाणीच्या बातमीदारानं दिली.

धुळे जिल्ह्यात देखील आज सकाळी धनगर समाज युवा संघटनांनी मोटरसायकल रॅली काढली. तसंच भारतीय जनता पक्षाच्या वतीनं रक्तदान शिबीर आणि अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित केला. त्याचबरोबर जिल्ह्यात विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><>

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या चौंडी या अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगावी त्यांची जयंती साजरी होत आहे. जयंतीच्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, अतुल सावे उपस्थित आहेत. यावेळी विविध विकासकामांचा आज प्रारंभ केला जाणार आहे.

सुराज्य म्हणजे काय हे अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रशासनातून दिसून येतं, त्या महाराष्ट्राच्या अभिमान होत्या, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. सरकारी खजिना हा लोकांसाठी असतो ही शिकवण अहिल्यादेवींनी दिली, स्वतःच्या मुलीचं आंतरजातीय लग्न लावून जातीभेदाला गाडण्याचं काम केलं. त्यांनी माणुसकी आणि कल्याणाचा धर्म पाळला, असं शिंदे म्हणाले.

विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आपलं मनोगत यावेळी व्यक्त केलं. राज्य सरकारने चौंडी इथल्या विकास आराखड्यासाठी ६८१ कोटी मंजूर केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. जयंती उत्सवाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आमंत्रित केलं होतं. मात्र ते येऊ शकले नाहीत. पण पुढच्या वर्षी प्रधानमंत्र्यांनी यावं अशी सगळ्यांची इच्छा आहे, असं शिंदे म्हणाले.

<><><><>

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी सात बहुपक्षिय शिष्टमंडळ वेगवेगळ्या देशांना भेटी देत आहेत.

काँग्रेस खासदार शशि थरूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज कोलंबियाच्या परराष्ट्र व्यवहार उपमंत्री रोझा योलांडा व्हिलाविचेंसिओ यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान पाकिस्तानबद्दल शोक व्यक्त करणाऱ्या कोलंबियाच्या विधानावर थरूर यांनी नाराजी व्यक्त केली. मात्र भारताच्या भूमिकेला कोलंबियानं पाठिंबा दिला असून हे विधान मागे घेतल्याचं त्यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं सिएरा लिओनचा दौरा पूर्ण केला. शिष्टमंडळाने संसदेचे सभापती, उपसंरक्षण मंत्री, राष्ट्रीय सुरक्षा समन्वयक, यांच्यासह सिएरा लिओनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

द्रमुक खासदार कनिमोळी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं लाटवियामधल्या भारतीय समुदायाशी संवाद साधला.

<><><><>

जम्मू-काश्मीरमध्ये आज संध्याकाळी पाच वाजता ‘व्यापक नागरिक सुरक्षा मॉक ड्रील’ आयोजित करण्यात येणार आहे. आपत्कालीन इशाऱ्यांचं अनुकरण करत जम्मू

काश्मिरमध्ये अनेक ठिकाणी यावेळी सायरन सक्रीय केले जातील. मॉक ड्रीलमध्ये नियंत्रित हवाई हल्ल्यांदरम्यान सायरन सक्रीय करणं, नागरी परिसरात ब्लॅकआऊट प्रोटॉकॉल आणि ड्रोन हल्ल्यांच्या स्थितीत सैनिकी छावणी जवळून कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलवणं तसंच आपत्कालीन परिस्थितीत उपाय योजना करणं आदींचा यात समावेश आहे.

<><><><>

आर्थिक वर्ष २०२६मध्ये भारत सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून आपले स्थान कायम राखणार असल्याचा अंदाज भारतीय स्टेट बँकेच्या अहवालात व्यक्त केला आहे. मूलभूत आर्थिक तत्व, आर्थिक क्षेत्रातली लवचिकता आणि शाश्वत वाढीवर लक्ष केंद्रित केल्यानं अर्थव्यवस्थेनं स्थान टिकवल्याचं या अहवालात म्हटलं आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये चौथ्या तिमाहीतल्या ७ पूर्णांक ४ दशांश टक्के वाढीमुळे भारताचं ठोस राष्ट्रीय उत्पादन ६ पूर्णांक ५ दशांश टक्के राहील. या पूर्ण आर्थिक वर्षात भांडवल निर्मितीनं ७ पूर्णांक १ दशांश टक्क्यांचा टप्पा गाठला असंही या अहवालात नमूद केलं आहे.

<><><><>

मंगोलिया इथे आयोजित ‘उलान बातर २०२५ कुस्ती स्पर्धेत’ भारतीय कुस्तीवीरांनी काल ४ सुवर्णपदकांसह एकूण सहा पदकं पटकावली. पॅरिस २०२४ ऑलिम्पिक पदक विजेती अंतिम पंघालनं ५३ किलो वजनी गटात आपल्या प्रतिस्पर्ध्यावर १०-० अशा मोठ्या फरकानं विजय मिळवला. ५७ किलो वजनी गटात नेहा संगवाननं, बोलोरतुया खुरेलखू या ऑलिम्पिक पदक विजेतीवर ४-० अशी मात करत सुवर्णपदक पटकावलं. तर, मुस्काननं ५९ किलो आणि हर्षितानं ७२ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावलं. याव्यतिरिक्त, पुरुषांच्या ग्रीको-रोमन ६० किलो वजनी गटात सुरज यानं रौप्य तर महिलांच्या ५० किलो फ्रीस्टाईल गटात निलमनं कांस्य पदक पटकावलं.

<><><><>

दक्षिण कोरियात चांगवॉन इथं झालेल्या दिव्यांगांच्या नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत महिलांच्या पी टू - १० मीटर एअर पिस्तुल एसएच वन प्रकारात भारताच्या मोना अग्रवाल हिने रौप्य पदक जिंकलं आहे. २०२४ च्या पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेतली कांस्यपदक

विजेती अवनी लेखरा हिचं पदक थोडक्यात हुकलं आणि तिला या स्पर्धेत चौथ्या स्थानावर समाधान मानावं लागलं.

**<><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये उद्या होणाऱ्या क्वालिफायर टू सामन्यामध्ये पंजाब किंग्स विरुद्ध मुंबई इंडियन्स यांची लढत होईल. हा सामना अहमदाबाद इथं होणार आहे. या दोन्ही संघातला विजेता येत्या ३ तारखेला रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरुविरुद्ध अंतिम सामना खेळेल.

**<><><>**

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याचा चेक जोडीदार ॲडम पावलासेक यांनी तिसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. दुसऱ्या फेरीत त्यांनी फॅबियन रेबोयूल आणि सॅडिओ ड्युम्बिया या प्रतिस्पर्धी जोडीवर ७-६, ६-२ अशा गुण फरकाने विजय मिळवला.

**<><><>**

अरुणाचल प्रदेशात काल रात्री पूर्व कामेंग जिल्ह्यात बाना आणि सेप्पा दरम्यान राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या भूस्खलनात सात जणांचा मृत्यू झाला. सेप्पाकडे जाणारं एक वाहन भूस्खलनामुळे रस्त्यावरून खाली कोसळलं. बचाव पथकांनी मृतदेह बाहेर काढले असून त्यांची ओळख अद्याप पटलेली नाही. अरुणाचल प्रदेशचे गृहमंत्री मामा नाटुंग यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><>**

मिझोराममध्ये लाँगटलाई शहरात मुसळधार पावसामुळे भूस्खलन होऊन झालेल्या दुर्घटनेत काही इमारती कोसळल्या आहेत. या इमारतीत अनेक रहिवासी अडकून त्यांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही दुर्घटना काल रात्री साडे दहा वाजण्याच्या सुमाराला घडली. एसडीआरएफची पथकं तसंच थर्ड इंडियन रिझर्व्ह बटालियनचे जवान घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी बचावकार्य सुरू केलं आहे. मुसळधार पावसामुळे बचावकार्यात अडथळे येत आहेत.

**<><><>**

आकाशवाणी मुंबईच्या ज्येष्ठ निवेदिका सुनीता तारापुरे ३८ वर्षांच्या सेवेनंतर काल निवृत्त झाल्या. आकाशवाणीच्या सोलापूर, नाशिक, सिंधुदूर्ग नगरी आणि मुंबई अशा विविध केंद्रांवर त्यांनी निवेदिका म्हणून काम केलं आहे. अनेक मालिकांचं निवेदन, निर्मिती, अभिवाचन आपल्या सुस्पष्ट आवाजानं आणि वैशिष्ट्यपूर्ण निवेदन शैलीनं त्यांनी असंख्य श्रोत्यांची मन जिंकली. सेवानिवृत्ती निमित्त आकाशवाणी मुंबईत त्यांच्यासाठी निरोप समारंभाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><><>**

करदात्यांना सेवा देणं हे कर विभागाच्या अधिकाऱ्यांचं कर्तव्य असून त्यांनी हे काम पारदर्शकपणे आणि सचोटिने करावं असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. जीएसटी नोंदणीसाठी अर्ज केलेल्या व्यावसायिकाच्या बाबतीत केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळानं दिलेल्या सविस्तर स्पष्टीकरणाबाबत समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये त्यांनी हे विधान केलं आहे.

**//<><><><>//**